# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


महत्वाचे

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/2992
दिनांक :- 22 JUN 2018

प्रति,
**प्राचार्य,**
शासकीय /अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित,
पदवी पदविका व पदव्युत्तर पदवीका
**औरंगाबाद विभाग**

**विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्रतेच्या अटीत सुधारणा करणेंबाबतच्या शासन निर्णयातील अटीबाबत....**

**संदर्भ :-**
१. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तशिसं/ईबीसी/ वि.का. /२०१८/२०३ दि.२५.०५.२०१८
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय : टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४ दि.२१ जुन,२०१७
३. शासन पत्र,उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१९३/तांशि-४ दि.०९.०५.२०१८

उपरोक्त सदंर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, शासनाकडून वरील संदर्भ क्र.२ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनांचा लाभ मर्यादित ठेवण्यासाठी सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील दोन अपत्यांपर्यत राहिल, अशी अट परिच्छेद क्र.५ मध्ये नमूद केलेली आहे. सदर मुदयास अनुसरुन शासनाकडे मार्गशर्दन मागितले असता शासनाने वरील संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये सदर मुदयाबाबत सदर योजनांचा लाभ हा आर्थिकदृष्टया दुर्बल कुटुंबातील अपत्य संख्येचा विचार न करता कुटुंबातील कोणत्याही **दोन पात्र अपत्यांना देण्यात** यावा असे निर्देश दिलेले आहेत.(सोबत सदर शासन पत्राची प्रत जोडली आहे.)

तरी सदर शासन पत्रानुसार आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

सोबत : वरील प्रमाणे

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

संकीर्ण-२०१८/प्र.क्र. १९३/तांशि-४,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
खो.क्र.४४१, चौथा मजला,
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई : ४०० ०३२
दूरध्वनी क्र. ०२२-२२०४ ०९३५
दिनांक : ९ मे, २०१८.

पत्र प्राप्त झाले
11 MAY 2018
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्रतेच्या अटीत सुधारणा करणेबाबतच्या शासन निर्णयातील अटीबाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्र. का.क्र. १८/तंशिसं/शा.पत्र/(DBT)/२०१८/१२४, दिनांक ३१/०३/२०१८

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक २१ जून, २०१७ मध्ये "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व " डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना " या योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहील, अशी अट नमूद करण्यात आली आहे. या अटीचा अर्थ हा " सदर योजनेचा लाभ दोनपेक्षा जास्त अपत्य संख्या असलेल्या कुटुंबातील शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही दोन अपत्यांना मर्यादित राहील ", अशी आपली धारणा असल्याची आपण उपरोक्त संदर्भाधीन पत्रात नमूद केले आहे.

३. उपरोक्त शासन निर्णयामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील अपत्य संख्येचा विचार न करता कुटुंबातील कोणत्याही दोन अपत्यांपर्यंत "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व " डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना " या योजनेंचा लाभ मर्यादित ठेवण्यासाठी सदर योजनेंचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहील, अशी अट नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे " सदर योजनांचा लाभ दोनपेक्षा जास्त अपत्य संख्या असलेल्या कुटुंबातील शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही दोन अपत्यांना मर्यादित राहील ", याबाबत असलेली आपली धारणा पक्की करण्यात येत आहे. त्यानुसार सदर योजनांचा लाभ हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील अपत्य संख्येचा विचार न करता कुटुंबातील कोणत्याही दोन पात्र अपत्यांना देण्यात यावा.

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. 211-1307
दिनांक 14.5.18
कार्यासन क्र. 15

( म. मा. मोरवे )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

F:\Sujata\letters 2018\DTE अभिप्राय.docx